# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :—www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.**
पत्र क्र.रासेयो/२७१/२०१८—१९
दिनांक : १२ ऑगस्ट, २०१८

प्रति,
प्राचार्य,

मा. महोदय,

पाण्याचे दुर्भिक्ष आणि प्रदूषण यामुळे आज जगामध्ये जलसंवर्धन या विषयावरती विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत. भारतातील डॉ. राजेंद्र सिंह हे मोठया प्रमाणावर जलसंवर्धनावर कार्य करत आहेत.

सिंधुदुर्ग जिल्हयातील विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे दिनांक १८ ऑगस्ट, २०१८ रोजी जलसंवर्धनावर कार्यशाळा घेत आहे. या कार्यशाळेत डॉ. राजेंद्र सिंह व मा. कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर हे संबोधीत ठरणार आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयात मोठया प्रमाणात पाऊस पडूनही सप्टेंबर नंतर पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. या संदर्भात जनजागृती होणे गरजेचे आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी दिनांक १८ ऑगस्ट, २०१८ रोजी सकाळी ९.०० वाजता खालील तक्त्याप्रमाणे सदरील कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय तळेरे येथे पाठवावेत.

| महाविद्यालयाचे नाव | स्वयंसेवक संख्या |
|---|---|
| आबासाहेब मराठे महाविद्यालय, राजापूर, रत्नागिरी. | २० |
| आनंदीबाई रावराणे आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, वैभववाडी, सिंधूदुर्ग | ४० |
| आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, तळेरे, ता. कणकवली, सिंधुदुर्ग. | ५० |
| आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, फणसगाव, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग | ५० |
| आर्टस्, कॉमर्स कॉलेज, खारेपाटन, ता. कणकवली, सिंधुदुर्ग | ५० |
| संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | ४० |
| कणकवली महाविद्यालय, कणकवली | १० |
| एस. पी. के. महाविद्यालय, सावंतवाडी | १० |
| डॉ. जे. बी. नाईक महाविद्यालय, सावंतवाडी | १० |
| एकूण | २८० |

सिंधूदुर्ग जिल्हयातील इतर महाविद्यालयांनी सदरील कार्यक्रमास ५ ते १० स्वयंसेवक पाठवावेत.

सूचना:— १) पर्यावरणाच्या दृष्टीने प्रत्येक स्वयंसेवकाने पाण्याची बाटली स्वत: सोबत ठेवावी.
२) दुपारच्या भोजनाची व्यवस्था आयोजकांनी केलेली आहे. त्यासाठी स्वयंसेवकांनी स्वत:ची प्लेट सोबत आणावी.
३) जलसंवर्धन विषयावरती दुपारी १२.०० वाजता रॅली काढली जाणार आहे. प्रत्येक महाविद्यालयाने रॅलीमध्ये बॅनर, पोस्टर, घोषणा इत्यादीचा उपयोग करुन रॅलीमध्ये सहभागी व्हावे. रॅलीमध्ये उत्कृष्टपणे सहभाग नोंदवणाऱ्या महाविद्यालयास पारितोषिक दिले जाणार आहे.

आपला विश्वासू ,

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभाग